**सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी मागेल त्याला शेततळे योजनेकरिता निधी आयुक्त (कृषी), पुणे यांच्याकडे वर्ग करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग (रोहयो)
शासन निर्णय क्र.शेतत-२०१७/प्र.क्र.१८/रोहयो-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - १ ऑगस्ट, २०१७.

**वाचा:-**

१) नियोजन विभागाचा , शासन निर्णय- क्रमांक क्र.शेतत-२०१६/प्र.क्र.१(७४)/रोहयो-५, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६
२) नियोजन विभागाचा , शासन निर्णय- क्रमांक क्र. शेतत-२०१६/प्र.क्र.१(७४)/रोहयो-५, दिनांक १० ऑक्टोबर, २०१६
३) नियोजन विभागाचा , शासन निर्णय- क्रमांक क्र. शेतत-२०१६/प्र.क्र.१(७४)/रोहयो-५, दिनांक १६ मे, २०१६
४) नियोजन विभागाचा , शासन निर्णय- क्रमांक क्र. शेतत-२०१७/प्र.क्र.१८/रोहयो-५, दिनांक १३ एप्रिल, २०१७.
५) नियोजन विभागाचा , शासन निर्णय- क्रमांक क्र. शेतत-२०१७/प्र.क्र.१८/रोहयो-५, दिनांक १३ मे, २०१७.
६) कृषि सह संचालक, मृद् संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे, दिनांक १२.०७.२०१७.

**प्रस्तावना-:**

सन २०१७ - १८ करिता "मागेल त्याला शेततळे" योजनेअंतर्गत रू. १०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने रू.१०० कोटी निधीपैकी दिनांक १३ एप्रिल, २०१७ च्या शासन निर्णयान्वये १६,६६,६७,०००/-(अक्षरी सोळा कोटी सहासष्ट लक्ष सदुसष्ट हजार फक्त) इतका निधी तसेच दिनांक २० मे, २०१७ च्या शासन निर्णयान्वये ६३,३३,३३,०००/- (अक्षरी त्रेसष्ट कोटी तेहतीस लक्ष तेहतीस हजार फक्त) इतका निधी आयुक्त (कृषि) यांच्याकडे वितरित करण्यात आला आहे. आता आयुक्त (कृषी) यांनी सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात मागेल त्याला शेततळे योजनेअंतर्गत अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या निधीपैकी उर्वरीत रू. २०.०० कोटी (रु. वीस कोटी फक्त) इतक्या निधीची मागणी केली आहे. तद्नुसार शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय -:**

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात "मागेल त्याला शेततळे" योजनेसाठी रु. १०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. त्यापैकी रु. ८० कोटी इतका निधी यापूर्वी वितरीत करण्यात आला असून उर्वरीत रु. २०.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर आयुक्त (कृषी) यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. प्रत्यक्ष निधीचे वाटप व नियमाप्रमाणे देय रक्कम याची जबाबदारी आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे यांची राहील.

२. सदर निधी चालू आर्थिक वर्षातच खर्च होणे आवश्यक असून तो व्यपगत होणार नाही अथवा अनावश्यक रितीने कोषागारातून आहरित करुन तो बँकेत काढून ठेवला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

३. नियोजन विभाग मागणी, क्रमांक "ओ-३, उपशिर्ष २५०५, ०२ ग्रामीण रोजगार हमी योजना, १०१ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ६०, इतर कार्यक्रम, १०१, रोजगार हमी योजना पंचावार्षिक योजनांतर्गत योजना (०१) रोजगार हमी योजना, (०१) (०१) रोजगार हमी योजना, (०१)(०८) दुष्काळ प्रतिबंधक उपाययोजनांतर्गत मागेल त्याला

शेततळे बांधणे (२५०५ए०३१) ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर), या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक २४८/ १७ /व्यय- ८ दि. १/८/२०१७ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(डॉ. प्रमोद शिंदे)**
**उपसचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन**

प्रति,

आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे,
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर,
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व उपसचिव/अवर सचिव / कार्यासन अधिकारी, (रोहयो)
निवडनस्ती मग्रारो-५.